पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.क्रिडा समिती
कार्यपत्रिका क्रमांक :- ३
सभावृत्तांत

दिनांक :- १६/ ०५ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रिडा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - १६/०५/२०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. थोरात वनिता एकनाथ - सभापती
२) मा. काळभोर वैशाली जालिंदर
३) मा.जयश्री वसंत गावडे
४) मा. अप्पा ऊर्फ संपत ज्ञानोबा पवार

याशिवाय मा.गायकवाड-सहा.आयुक्त, मा.भंडारे-प्र.उपनगरसचिव, मा.पानसरे - क्रिडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला -

विषय क्रमांक २ :- परदेशी जाणाऱ्या खेळाडूंना आर्थिक मदत देणेबाबत-
मा.जयश्री गावडे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव..

----------

दिनांक ०२/०५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक :-७ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १६/०५/२०१२ विभाग :- क्रिडा विभाग
सुचक :- मा.जयश्री गावडे अनुमोदक :- मा.वैशाली काळभोर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/७/कावि/७२९/११ दि.२२/१२/२०११

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना आंतरकचेरी कबड्डी, कॅरम (पुरुष),कॅरम (महिला),हॉकी,बुध्दीबळ,लॉन टेनिस,फुटबॉल जलतरण या ८ खेळांच्या स्पर्धा आयोजित करणेकामी आर्थिक पुरस्कार देण्यासाठी पुना डिस्ट्रीक्ट इंटर ऑफिसेस स्पोर्ट्स असोसिएशन यांना एकूण आर्थिक सहाय्य र.रु.१,३२,६००/- (अक्षरी र.रु.एक लाख बत्तीस हजार सहाशे) अदा करणेस व सदरचा खर्च क्रीडा निधीमधील वार्षिक क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

<u>सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला -</u>

ठराव क्रमांक :- ८ विषय क्रमांक :- २
दिनांक :- १६/०५/२०१२
सुचक :- मा.जयश्री गावडे अनुमोदक :- मा. वैशाली काळभोर
संदर्भ :- मा.जयश्री गावडे, मा.वैशाली काळभोर यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील विविध क्रीडा प्रकारातील विविध प्रकारचे खेळाडू अतिशय मेहनती व होतकरु असून विविध खेळांमध्ये कौशल्य प्राप्त करीत असतात. शहरातील या गुणी खेळाडूंना परदेशात प्रशिक्षण किंवा स्पर्धेत भाग घेणेसाठी निवड होते. परंतु हे सर्व खेळाडू सर्वसामान्य कुटूंबातील असल्यामुळे व आर्थिक परिस्थिती बेताची असल्यामुळे कौशल्य असूनही त्यांना परदेशात जाणे शक्य होत नाही. त्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भाग घेण्यापासून वंचित राहतात व गुणवत्ता असूनही केवळ आर्थिक बाबींमुळे ते मागे पडतात. त्यामुळे सांघिक खेळातील खेळाडूंना प्रत्येकी र.रु.५,०००/- वैयक्तिक खेळासाठी खेळाडूस र.रु.१०,०००/- आर्थिक मदत देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

[ थोरात वनिता एकनाथ ]
सभापती
क्रिडा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/८०६/२०१२
दिनांक :- १७/०५/२०१२ चे लगत

प्र. उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\१७२.१६.०.६८\e\e drive\Nagersachiv१\Krida ११-१२\Proceeding_२.doc